# आकाशवाणी पुणे

# प्रादेशिक वृत्त विभाग

# पुणे वृत्तांत

# वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक-01.06.2026** **वार- सोमवार**

---

**राज्यसभा निवडणूक**

राज्यसभेच्या 24 जागांसाठी होणाऱ्या द्वैवार्षिक निवडणुकीची अधिसूचना आज जारी करण्यात आली. आजपासून येत्या 8 जूनपर्यंत या निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज भरण्याची मुदत आहे. 18 जूनला मतदान आणि त्याच दिवशी मतमोजणी होणार आहे. या 24 जागांमध्ये उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी राजीनामा दिल्यामुळे रिक्त झालेल्या जागेचा समावेश आहे.

**विधानपरिषद निवडणूक**

राज्य विधानपरिषदेच्या 17 जागांसाठी होणाऱ्या द्वैवार्षिक निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज भरण्याचा आज शेवटचा दिवस आहे. या निवडणुकीसाठी मतदान आणि मतमोजणी 22 जूनला होईल. महायुतीच्या जागावाटपामध्ये पुण्यातील विधानपरिषदेची जागा राष्ट्रवादी काँग्रेसला मिळाली असून विक्रम काकडे आणि सुनील टिंगरे या दोघांनीही उमेदवारी अर्ज दाखल केला आहे. महाविकास आघाडीकडून राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष ही जागा लढवणार आहे.

**पीएम स्वनिधी**

पीएम स्वनिधी योजनेमुळे असंख्य फेरीवाल्यांना विनातारण कर्ज आणि विकासाच्या नव्या संधी मिळाल्या. या योजनेनं त्यांचं आयुष्य बदलवून टाकलं असं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. पंतप्रधान स्वनिधी योजना सुरू होऊन आज सहा वर्ष पूर्ण झाली. यानिमित्त समाज माध्यमावरील संदेशात मोदींनी ही योजना विश्वास, सन्मान आणि सक्षमीकरणाचं प्रतीक असल्याचं नमूद केलं आहे. या योजनेद्वारे आतापर्यंत 1 कोटी 12 लाखांपेक्षा जास्त कर्ज वितरित करण्यात आली आहेत.

**दरवाढ**

व्यावसायिक वापरासाठीच्या सिलेंडरच्या दरांमध्ये वाढ झाली आहे मात्र घरगुती वापरासाठीच्या गॅसच्या दरात बदल झालेला नाही. 19 किलो वजनाचा व्यावसायिक सिलेंडरचा दर 43 रुपयांनी तर पाच किलोच्या सिलेंडरचा दर 11 रुपयांनी वाढला आहे.

**जेईई ॲडव्हान्स निकाल**

भारतीय तंत्रज्ञान संस्था अर्थात आयआयटी प्रवेशासाठीच्या जेईई ॲडव्हान्स परीक्षेचा निकाल आज जाहीर झाला. या परीक्षेत 56, 880 विद्यार्थी यशस्वी झाले असून यात 10,107 विद्यार्थिनींचा समावेश आहे. मुलांमध्ये शुभम कुमार यानं तर मुलींमध्ये आरोही देशपांडे हिनं प्रथम क्रमांक पटकावला.

**नीट पेपर फुटी**

नीट युजी परीक्षेची प्रश्नपत्रिका फुटल्याप्रकरणी दिल्ली न्यायालयानं तीन आरोपींना येत्या 15 जूनपर्यंत न्यायालयीन कोठडी सुनावली आहे. यातील लातूरचे डॉक्टर मनोज शिरुरे यांच्यावर तीन विद्यार्थ्यांना रसायशास्त्राचे प्रश्न पुरवल्याचा तर पुण्यातील शिक्षिका मनिषा हवालदार यांनी अन्य एक आरोपी तेजस शहा याला भौतिकशास्त्राचे प्रश्न पुरवल्याचा आरोप सीबीआयनं गुन्हा दाखल करताना नोंदवला आहे.

दरम्यान, नीटची फेरपरीक्षा सध्याच्या लेखी स्वरुपाऐवजी संगणकावर घ्यावी अशी मागणी करणारी याचिका आज सर्वोच्च न्यायालयानं फेटाळली.

**<u>संघ शताब्दी</u>**

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या शताब्दी वर्षानिमित्त पुण्यातील मिती फिल्म सोसायटीच्या वतीनं 'पंचपरिवर्तन शॉर्ट फिल्म आणि रील' स्पर्धा तसंच महोत्सवाचं आयोजन करण्यात आलं आहे. या स्पर्धेतील विजेत्यांना दीड लाख रुपयांची रोख बक्षिसं, स्मृतीचिन्ह आणि प्रमाणपत्रं दिली जाणार आहेत, अशी माहिती संस्थेचे अध्यक्ष मिलिंद लेले यांनी पत्रकार परिषदेत दिली. स्पर्धेत सहभागी होण्यासाठी इच्छुकांनी गुगल फॉर्मद्वारे आपली प्रवेशिका आणि रील किंवा शॉर्ट फिल्म 15 जुलैपर्यंत पाठवायची आहे. नवनवीन विषय आणि सामाजिक संदेश देणाऱ्या कलाकृतींसह जास्तीत जास्त तरुण आणि चित्रपटप्रेमींनी या स्पर्धेत सहभागी व्हावं, असं आवाहन आयोजकांनी केलं आहे. येत्या 15 आणि 16 ऑगस्ट रोजी हा महोत्सव आणि स्पर्धेचं पारितोषिक वितरण होणार आहे.

**<u>पीसीएमसी पावसाळी कामे</u>**

आगामी पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर पिंपरी चिंचवड शहरातील नालेसफाई मोहीमेला वेग आला आहे. आतापर्यंत महापालिकेनं हाती घेतलेल्या कामांपैकी सुमारे 92 टक्के कामं पूर्ण झाली आहेत. महापालिकेच्या विविध क्षेत्रीय कार्यालयांमार्फत गेल्या मार्च महिन्यापासून नाले सफाई मोहीम सुरू करण्यात आली होती.

**<u>निवड</u>**

दी इन्स्टिट्यूट ऑफ कॉस्ट अकाउंटंट्स ऑफ इंडियाच्या पुणे चॅप्टरच्या अध्यक्षपदी राहुल चिंचोळकर यांची निवड झाली आहे. मावळते अध्यक्ष श्रीकांत इप्पलपल्ली यांच्याकडून त्यांनी कार्यभार स्वीकारला. संस्थेच्या उपाध्यक्षपदी हिमांशू दवे, सचिवपदी तनुजा मंत्रवादी, तर खजिनदारपदी अमेय टिकले यांची निवड झाली आहे.

**<u>हवामान</u>**

पुणे आणि परिसरात आज कमाल 37 तर किमान 24 अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली. उद्या तापमानात फारसा बदल संभवत नाही. दिवसभर आकाश निरभ्र असेल आणि संध्याकाळी आकाश अंशतः ढगाळ असेल असा हवामान विभागाचा अंदाज आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर संध्याकाळी 6 वाजता, ताज्या पुणे वृत्तांतसह. नमस्कार.**